| | |
|---|---|
| Title of the Activity | Invited Talk by Dr. Gaikwad on Disadvantageb of tobaccco on the cancer Day |
| Organizing Department | NCC and NSS |
| Date | 04 Feb 2019 |
| Venue | AV theator G.S.College Khamgaon |
| Guest/ Resource Persons | Dr.Ashok Gaikwad MBBS.MD |
| No of Beneficiaries | Students 193 Teacher- 14 |
| Brief Report about event | Cancer Awareness Day was celebrated with great enthusiasm at G.S.COLLEGE College, Khamgaon on 04th Feb 2019. The event aimed to raise awareness about cancer, its prevention, and support for those affected by the disease. Organized by the college's NCC and NSS Unit of our College , the day included a variety of activities designed to educate and engage students, faculty, and staff. Chief Guest and Speaker of this Programme Dr. Ashok Gaikawad MBBS MD give Topics covered included common types of cancer, signs and symptoms, preventive measures, and the importance of regular screenings whose Give a lot of information about how to spread the cancer and it harmful effect. President of this programme Dr. D.S.Talwankar Principal of our college. Anchoring done by Dr. Hanumant Bhosle sir, Prof. K.K.Pathan and NCC and NSS cadet Present. |











Daily Exclusive
देशोन्नती बुलडाणा/शुक्रवार, दि. ८ फेब्रुवारी २०१९

# तंबाखूजन्य पदार्थामुळे २२ प्रकारचे कॅन्सर - डॉ. अशोक गायकवाड



मार्गदर्शन करतांना डॉ. अशोक गायकवाड

**कार्यालय प्रतिनिधी** / ७ फेब्रुवारी

**खामगाव** : सध्याच्या धैनीच्या जीवन शैलीमध्ये धूम्रपान व तंबाखू जन्य पदार्थांचे सेवन वाढलेले आहे. तंबाखूजन्य पदार्थामुळे २२ प्रकारचे कॅन्सरचा धोका निर्माण होतो. धूम्रपान व तंबाखू सेवनाने केवळ कॅन्सरच नाही तर हृदयविकार, उच्च रक्तदाब, अर्धांगवायू, पायाचे गॅंगरीन, नपुंसकत्व याचाही धोका उद्‌भवतो, अशी माहिती डॉ.अशोक गायकवाड (पाटील) सर्जन, खामगांव यांनी गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय व योध्दा फाऊंडेशन यांच्यावतीने ६ फेब्रुवारी रोजी आयोजित व्याख्यानात दिली.

तंबाखूचे शरीरावरील दुष्परिणाम व त्यामुळे होणारे कॅन्सर याचे कारणे त्यांनी अतिशय सोप्या भाषेत समजावून सांगितले. तसेच लवकर निदान झाले, तर कॅन्सर पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्यामुळे कॅन्सरबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे. असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. हनुमंत भोसले तर आभार प्रा. के. के. पठाण यांनी केले.

तोंडातील पांढरा चट्टा, गळ्याच्या न दुखणाऱ्या गाठी, चिवट खोकला किंवा आवाजातील बदल, वेदनारहित गाठ, पचनातील घट, न भरणारी जखम, मुक्ताीच सुरु झालेली बध्दकोष्टता अनैसर्गिक, रक्तस्त्राव, वेदना रहित झपाट्याने स्तनामध्ये वाढणारी गाठ ही कॅन्सरची लक्षणे असल्याचे सांगून तंबाखूमुळे दर ३० सेकंदाला एक मृत्यू होतो. वार्षिक जवळपास १० लाख लोक देशात मरण पावतात तंबाखूमुळे व धूम्रपानामुळे मधुमेह होण्याचे प्रमाण वाढवते. चांगले कोलेस्ट्रॉल कमी होते. ३५ टक्के लोक कुठल्याना कुठल्या स्वरूपात तंबाखू वापरतात. दरवर्षी ७ ते ८ लाख कॅन्सरच्या रुग्णाच्या नोंदणीमध्ये ४० टक्के रुग्णांना तोंडाचा कॅन्सर आहे. एका आकड्यानुसार २०२० पर्यंत मृत्यूच्या तीन मुख्य कारणापैकी एक कारण तंबाखू असेल, अशी भीषण आकडेवारीही डॉ.गायकवाड यांनी दिली. कॅन्सरवर त्यांनी स्वत: सर्जन असल्यामुळे व २७ वर्षाचा वैद्यकीय व्यवसायाचा अभ्यास असल्यामुळे, तंबाखू जन्य पदार्थामुळे कॅन्सर फक्त तोंडाचाच होत नाही तर शरीरातील कोणत्याही अवयवाचा कॅन्सर होवू शकतो म्हणून तंबाखू वापरणाऱ्या लोकांनी फक्त तोंडाच्या कॅन्सर कडेच लक्ष देवू नये, असे सांगून डोके, आणि मान यांचे कॅन्सरचे भारतात प्रमाण २५ टक्के आहे. हे पुरुषामध्ये जास्त व स्त्रियामध्ये तीन नंबरवर आहे. प्रत्येक वर्षी १ लाख तोंडाच्या कॅन्सरचे निदान होते. त्यापैकी ५० टक्के पेशंट एका वर्षाच्या आत मरण पावतात. ९० टक्के कॅन्सर तंबाखू, अल्कोहोल, गुटखा यांचेशी संबंधीत आहेत, असेही ते म्हणाले.

आजपासून निर्धार करा, हा दिवसाढवळ्या तुमच्या शरीरात, तुमच्या समोर घुसणारा, अतिरेकी (तंबाखू) तुमच्या शरीराचे नुकसान करेल म्हणून आपले कुटुंब वाचवा, देशाला व समाजाला मदत करा नाहीतर पुढच्या पिढीला वाईट दिवस येतील. तेव्हा आताच सावध व्हा, तंबाखूने काही होत नाही, या भ्रमात व गाफील राहू नका हे त्यांनी वारंवार सांगितले. सर्वात शेवटी राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.